362

२८७

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे-१६**
( यापुढील पत्रव्यवहारासाठी खालील क्रमांक व दिनांक याचा उल्लेख करावा. )

( जागेच्या व इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

**बांधकाम चालू करण्याकरिता दाखला**
**दुरुस्त ( कमेन्समेंट सर्टिफिकेट )**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

(प्रथम मान्यता - जा.क्र. झोपुप्रा/तां ५/प्र.क्र. ८९/२९२ दि. १४/०२/२०१२
**दुरुस्त -** जा.क्र. झोपुप्रा/तां ५/प्र.क्र. ८९/२४३ दि. ०७/०२/२०१३)

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४/४५/५८/६९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४, व महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ यातील तरतूदींप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

जा.क्र. झोपुप्रा/तां५/प्र.क्र.८९/ १२५८ /१३
दिनांक- १३/०८/२०१३

प्रति,
**विकासक- मे. टारगेट इन्फ्राडेव्हलपर्स एल. एल. पी.,**
**१२०६/२१, कृष्णा स्मृती, जे.एम.रोड,**
**पुणे-०४.**
द्वारे
**आर्किटेक्ट- मे. ओंकार असोसिएट्स,**
**२, तृप्ती अपार्टमेंट,**
**भांडारकर रोड, पुणे-०४.**

यांस--

महाराष्ट्र नगररचना अधिनियम, सन १६६६ ची कलमे ४४ / ४५ / ५८ / ६९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४ व महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ पुणे महानगरपालिका सीमेतील **पुणे पेठ घोरपडे, सि.स.नं. ३६२, ३६३ (पै), फा.प्लॉ.नं. १६१** येथील **दुरुस्त बांधकाम नकाशे** मान्य करण्यासाठी झो.पु.प्रा. ला तुम्ही दि. १०/०७/२०१३ रोजीच्या पत्राने विनंती केली. त्यावरुन खाली लिहिलेल्या सर्व अटींवर (भाग १ व २) तुम्हांस हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

**स्थापत्य अभियंता**
**झो.पु.प्रा. पुणे**

**उप अभियंता**
**झो.पु.प्रा. पुणे**

**( भाग - १ )**

१. सदरचे संमतीपत्रानंतर यापूर्वी संबंधित प्रस्तावासाठी दिलेली सर्व संमतीपत्रे रद्द समजावीत.

२. सदर योजनेच्या अंतर्गत रस्त्यावरील पाथवेवरील / दिवाबत्ती / पाणीपुरवठा नलीका, जलोत्सारण वाहिन्या इत्यादींची तरतूद व देखभाल करण्याची जबाबदारी विकसकावर राहील.

३. सदर योजनेमेधील इमारतीसाठी कोणत्याही प्रकारचे स्वतंत्र कुंपण / सिमाभिंत घालणे अनुज्ञेय नाही परंतु संपूर्ण योजनेच्या क्षेत्रासाठी कायमस्वरुपी कुंपण / सिमाभिंत चालू करणेपूर्वी झो.पु.प्रा. चे मार्गदर्शनाखाली बांधणे आवश्यक आहे.

४. सदर योजनेसाठी संबंधीत मनपा पाणीपुरवठा करु शकत नसेल तर पुरेश्या पाणी पुरवठयाची पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधीत विकसकावर राहील.

५. सदर योजनेमध्ये मंजूर करण्यात येणा-या डी.पी. रस्त्याचा विकास संबंधीत मनपाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार व मार्गदर्शनाखाली करण्याची जबाबदारी विकसकावर राहील.

६. डी.पी.रोड मधील क्षेत्राचा ताबा मनपाच्या संबंधीत कार्यालयाकडे सुपूर्त करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व ती कार्यवाही पूर्ण करुन भोगवटा पत्र मागणेपूर्वी ताबेयादी झो.पु.प्रा. कडे सादर करणार.

७. बांधकास सुरुवात करण्यापूर्वी संबंधीत मनपाचे स्पेशिफिकेशन व धोरणानुसार पाहोच रस्ता तयार करणार व त्याची देखभाल करण्याची जबाबदारी विकसकाची राहील.

८. संबंधी सुधारित विकास योजना आराखडा महाराष्ट्र सरकारने दि. ५/१/१९८७ या दिवशी मान्य केला आहे. त्यास अनुसरुन नवीन कामास काही उपसर्ग पोहोचत असल्यास अथवा हानी होत असल्यास त्या प्रित्यर्थ कोणत्याही प्रकारची भरपाई मागता येणार नाही. व ती देण्याची जबाबदारी झो.पु.प्रा. वर नाही.

९. सोबतच्या नविन/दुरुस्त नकाशात दाखविल्याप्रमाणे काम केले पाहिजे.

१०. जोत्यापर्यंत काम आल्यावर सेट बँक, मार्जिनल ओपन स्पेसेस इ. बाबी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयाकडून तपासून घेतल्याशिवाय जोत्यांवरील काम करु नये.

११. संबंधीत मनपाचे संबंधीत खात्याकडील नकाशानुसार प्राप्त झालेली रस्त्याची प्रमाणरेषा जागेवर आखून घेणार व मगच बांधकाम सुरु करणार या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

१२. सोबतच्या नकाशावर / मागे लिहिलेल्या / चिकटविलेल्या अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

१३. ज्या प्लॉट्सवर नवीन इमारत बांधण्यात येणार आहे त्या इमारतीचे भोगवटापत्र मागण्यापूर्वी प्रत्येक विकसकाने इमारतीसमोर कंपाऊंड वॉलच्या आत वृक्ष संवर्धन कायदा १९७५ च्या तरतूदींनुसार झाडे लावून ती व्यवस्थीत वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था व खबरदारी घ्यावी. त्याशिवाय ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट (भोगवटापत्र) मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरुर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे.

१४. इमारतीचे भोगवटापत्र देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचे अविशिष्ट सामान व राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही. राडारोडा कोठे टाकावा याबाबत संबंधीत मनपाच्या घरपोडी विभागामार्फत मार्गदर्शन खाली कार्यवाही करावी.